# मान्यवरांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य वाणिज्य परिषदेचे ३० वे अधिवेशन

# बोदवड महाविद्यालयात जोरदार तयारी




बोदवड येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयास महाराष्ट्र राज्य वाणिज्य परिषदेचे ३० वे अधिवेशन आयोजित करण्याचा सन्मान प्राप्त झाला आहे. सुमारे २९ वर्षानंतर खान्देशात हे अधिवेशन होत असल्याने, त्याला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. त्यानिमित्ताने राष्ट्रीय परिषदेचे आयोजन असून, देशातील व राज्यातील सुमारे ३०० पेक्षा जास्त प्रतिनिधी उपस्थित राहतील अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य आणि ३० व्या अधिवेशनाचे सचिव प्राध्यापक अरविंद चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सन १९८६ मध्ये राज्य वाणिज्य परिषदेची स्थापना झाली व नोंदणी करण्यात आली. राज्यातील विविध महाविद्यालयातील वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या प्राध्यापकांनी एकत्रित यावे, शैक्षणिक विषयांवर विचारमंथन करावे, अडचणी व समस्या यावर चर्चा व्हावी, परिणामकारक अभ्यासक्रम तयार व्हावा, राज्यातील व्यापार, उद्योग व्यवसाय यांना सहकार्य व्हावे या उद्देशाने राज्य वाणिज्य परिषद कार्यरत असते.

दरवर्षी अधिवेशनाचे आयोजन असते १९८७ मध्ये धरणगाव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एम. तल्हार यांनी धरणगाव येथे पहिले अधिवेशन आयोजित केले होते. सुमारे २९ वर्षानंतर राज्य वाणिज्य परिषदेचे आयोजन पुनश्च खानदेशात बोदवड महाविद्यालयात दि. १२ व १३ जानेवारी २०१९ रोजी आयोजित करण्यात आले असून, पूर्व तयारी पूर्ण झालेली आहे. त्यासाठी संस्थाचालक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी कार्यमग्न झालेले आहेत.

अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष म्हणून दि बोदवड सार्वजिक को-ऑप. एज्युकेशन सोसायटी लिमिटेड बोदवड संस्थेचे चेअरमन श्री. मिठुलालजी अग्रवाल हे असून, अधिवेशनाचा उदघाटन समारंभ दि. १२ जानेवारी २०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता होणार असुन 'राष्ट्रीय परिषदेचे' उदघाटन राज्याचे जलसंपदा व वैद्यकीय शिक्षणमंत्री मा. गिरीषजी महाजन यांच्या शुभ हस्ते, तर '३०व्या अधिवेशनाचे' उदघाटन माजी मंत्री व विद्यमान आमदार मा.एकनाथरावजी खडसे यांचे हस्ते होणार असून, याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून रावेर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार श्रीमती. रक्षाताई खडसे या उपस्थित राहणार आहेत. तर उपस्थितांना मार्गदर्शन करणेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे मा. कुलगुरू उद्धवजी भोसले, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे मा. प्र कुलगुरू प्राध्यापक पी.पी. माहुलीकर व मा.धनराज माने संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना निमंत्रित करण्यात आलेले आहे. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य वाणिज्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे ( नागपूर ), राज्य वाणिज्य परिषदेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. टी.ए. शिवारे ( मुंबई ), सचिव प्राचार्य जी.वाय शितोळे ( पुणे ), संस्थेचे उपाध्यक्ष अजयजी जैन, सचिव विकासजी कोटेचा, जेष्ठ संचालक अॅड. प्रकाशचंदजी सुराणा हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या अधिवेशनाचे विशेष वैशिष्टय म्हणजे अधिवेशनाचे अध्यक्षस्थानी ३० वर्षात प्रथमच महिला भूषविणार असून २९ व्या अधिवेशनाच्या आयोजक प्राध्यापक डॉ. अमिषा अरोरा ( नागपूर ) या ३०व्या अधिवेशनात कार्यक्रमाच्या अध्यक्षा असतील व अध्यक्षीय भाषण करतील.

या अधिवेशनाच्या निमित्ताने उदघाटन समारभांनंतर विशेष वक्त्यांचे 'वाणिज्य व व्यवस्थापन २१ व्या शतकातील आवाहन' या विषयावर व्याख्यान होईल, दुपारच्या सत्रात देशभरातून आलेल्या सहभागींचे विविध संशोधनावरील लेख वाचन होणार असून त्याची विभागणी तीन ठिकाणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार पहिल्या तांत्रिक सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. किर्ती गुप्ता ( भारती विद्यापीठ, पुणे ) या भूषविणार असून, सत्राचे समन्वयक म्हणून डॉ. रश्मी शर्मा ( नाहाटा कॉलेज, भुसावळ ) या काम पाहतील. दुसऱ्या तांत्रिक सत्राचे अध्यक्ष डॉ. विमल जैस्वाल ( लखनौ विद्यापीठ ) हे असतील, तर समन्वयक म्हणून डॉ. पवित्रा पाटील ( कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव ) हे काम पाहतील. तृतीय तांत्रिक सत्रात अध्यक्ष डॉ. शाम शुक्ला ( केंद्रीय रिसर्च डेव्हेलपमेंट, नागपूर ) हे काम पाहतील, तर समन्वयक डॉ. कल्पना पाटील ( एस.एस.व्ही.पी.एस. कॉलेज, धुळे ) या जबाबदारी सांभाळतील.

सायंकाळी देशभारातून आलेल्या उपस्थितांसाठी 'भजन संध्या कार्यक्रमाचे' आयोजन असून, प्रथम दिवसाचा कार्यक्रम पुर्ण होईल.

दि. १३जानेवारी २०१९ रोजी सकाळी पुन्हा तांत्रिक सत्राचा प्रारंभ होईल, सकाळी १०.३० वाजता महाराष्ट्र वाणिज्य परिषदेच्या व्यासपीठावर खान्देशातील व्यापार, उद्योग, व्यवसाय यांच्या प्रगतीचा आढावा दर्जी फाउंडेशन चे संचालक श्री. गोपाल दर्जी हे आपल्या व्याख्यानातून व्यक्त करतील, दुपारी ११.३० वाजता महाराष्ट्र राज्य वाणिज्य परिषदेच्या सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले असून त्यात विविध विषयांवर परिषदेचे सदस्य चर्चा करतील.

दुपारी १२.३० वाजता राज्य वाणिज्य परिषदेच्या ३०व्या अधिवेशनाचा समारोप समारंभाचा कार्यक्रम संस्थेचे जेष्ठ संचालक श्री. ॲड. प्रकाशचंदजी सुराणा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होईल. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष श्री. अजयजी जैन, सचिव विकासजी कोटेचा, दर्जी फाउंडेशनचे प्रमुख श्री. गोपाल दर्जी, हे उपस्थित राहतील.

या अधिवेशनात, तेलंगाणा, कर्नाटक, दिल्ली, मध्य प्रदेश, गुजरात, महाराष्ट्रातील पुणे, मुंबई, रत्नागिरी, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, लातूर, परभणी, नांदेड, जळगाव, धुळे, नंदुरबार, मालेगाव, कोल्हापूर, सोलापूर, अमरावती, वर्धा, अहमदनगर, ठाणे, पालघर, अकोला, या जिल्ह्यातून प्रतिनिधींनी नोंदणी केलेली आहे.

३०व्या अधिवेशनासाठी राज्य कार्यकारणीचे सर्व उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष, व कार्यकारणी सदस्य उपस्थित राहणार आहेत. महाविद्यालयाने अधिवेशन यशस्वी करण्यासाठी 'आयोजन समितीचे' गठन केले असून त्यात डॉ. पी.पी. छाजेड ( धुळे ), डॉ. सीमा जोशी ( विद्यापीठ ), श्री. जयेश काटकर ( पुणे ), डॉ. रश्मी शर्मा ( भुसावळ ), डॉ. शिल्पा बेंडाळे ( जळगाव ), डॉ. पी.आर. चौधरी ( फैजपूर ), डॉ. दिनेश बक्कड ( शिरपूर ), डॉ. श्याम साळुंके ( शेंदुर्णी ), प्रा. विजयसिंग गिरासे ( नंदुरबार ) यांची समिती केली असून, अधिवेशनासाठी 'सल्लागार समितीचे' गठन करण्यात आलेले आहे. त्यात डॉ. अनिल डोंगरे ( विद्यापीठ ), प्राचार्य अनिल लोहार ( जळगाव ), डॉ. राहुल कुलकर्णी ( चाळीसगाव ), डॉ. सचिन चौहान ( पुणे ), डॉ. अरुण इंगळे (अहमदनगर ), डॉ. दिलीप शिंदे ( नाशिक ), डॉ. सुहास धांडे ( इंदोर ), डॉ. किरण नेरकर ( नागपूर ), डॉ. विराज पटेल ( गुजरात ), डॉ. रिटा बिस्वास ( कोलकाता ), डॉ. एल.सी. कुरपेटवार ( औरंगाबाद ), डॉ. अनिल भंगाळे ( फैजपूर ), डॉ. महेश जोशी ( मुंबई ) डॉ. एस. बी. तळेकर ( परभणी ), डॉ. टेकळे ( नागपूर ) यांचा या समितीत समावेश आहे.

विविध संशोधकांचे लेख ' २१ व्या शतकातील वाणिज्य व व्यवस्थापन' या विषयावर मागविलेले असून, प्रत्यक्ष लेखाचे वाचन होणार आहे व छापील लेख विद्यापीठ अनुदान आयोग यादितील ' आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकेत' प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र राज्य वाणिज्य परिषदेच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठीचा डॉ. पी.सी. शेजवळकर व महादेवराव तल्हार ' उत्कृष्ट वाणिज्य शिक्षक पुरस्कार' तसेच शोध निबंधामधून 'उत्कृष्ट शोध निबंधक पुरस्कार' 'रमण पुरुषोत्तम' या नावाने दिला जाणार आहे. तसेच तरुण प्राध्यापकांना प्रोत्साहन म्हणून सौरभ शिवारे स्मुर्ती प्रित्यर्थ 'युवा संशोधक पुरस्काराची' घोषणा करण्यात येईल.

वरील तिनही पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत.

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी यांचे नैतृत्वाखाली या अधिवेशनाची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने भरविण्याचा संकेत स्थळावर करण्यात येत आहे. सर्व अतिथींची निवास व्यवस्था भुसावळ येथे करण्यात आलेली असून, निवास व्यवस्था जबाबदारी डॉ. मधुकर खराटे, डॉ. अकोश गोस्वामी, डॉ. मनोज निकाळजे हे सांभाळत आहेत.

अधिवेशन यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी, उपप्राचार्य श्री.डी.एस. पाटील, प्रा. डॉ.मधुकर खराटे, प्रा.डॉ.प्रभाकर महाले, प्रा.डॉ.शरद काठोके, प्रा.डॉ.व्ही.पी.चौधरी, डॉ.पराग नारखेडे, डॉ.एस.जे.साळुंके, प्रा.अमेय लोहार, प्रा. डॉ.अपर्णा चंद्रस, प्रा.डॉ.कामिनी तिवारी, श्रीमती.हेमलता कोटेचा, प्रा.अजय पाटील, डॉ.रुपेश मोरे, डॉ.गीता पाटील, प्रा.नरेंद्र जोशी, श्री.विजय बडगुजर, प्रा.नितेश सावदेकर, श्री.बाबुराव हिवराळे, श्री.शेखरसिंग चौहान, श्री वैभव कासार, श्री.जितेंद्र शर्मा, श्री.योगेश राजपूत, श्री.समीर पाटील, श्री.राजेंद्र मोपारी, श्री.नामदेव बडगुजर, श्री.जितेंद्र बडगुजर, श्री.सुभाष भोई, श्री.दिपक जोशी, अतुल पाटील, मुकेश बडगुजर परिश्रम .



